दि.६ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर पदांच्या निश्चित करण्यात आलेल्या आकृतीबंधानुसार पदनिहाय मंजूरी देणेबाबत...

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई**

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.टीएमयु २०१०/(४५५/१०)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ सप्टेंबर, २०१०.

**वाचा :** (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१०.९.२००१.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा, दि. १.७.२००४.

(३) शासन निर्णय क्र.संकीर्ण २००७/(१२२/०७)/विशि-प्रशा, दिनांक ६ जुलै, २००९.

(४) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाचे क्र.आस्थापना/जन-९७/२०१०-११/३०६, दि.२१-०६-२०१०

**प्रस्तावना :-** _वित्त विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१०.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करावे व आकृतिबंध अंतिम झाल्याशिवाय रिक्त पदे भरु नयेत असे सर्व प्रशासकीय विभागांना आदेशित केले. वित्त विभागाच्या वरील निर्णयानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या शिक्षकीय व शिक्षकेतर पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रक्रियेला लागणारा विलंब लक्षात घेता शासनाने संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक १ जुलै, २००४ च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय प्रवर्गांची ९०% व खुल्या प्रवर्गाची ५०% रिक्त पदे भरण्याची मुभा दिली. अशी सूट देऊनही अपुऱ्या मनुष्यबळामुळे विद्यापीठाच्या कामावर विपरीत परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. वित्त विभागाच्या दि.१०.९.२००१ च्या निर्णयामुळे एका बाजुला सन २००१ रोजी अस्तित्वात असलेली रिक्त पदे भरता आली नाहीत, तर दुसऱ्या बाजुला सन २००१ नंतर वाढलेल्या कामासाठी आवश्यक पदांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेता आला नाही. दरम्यानच्या काळामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.८०६७/२००६ मध्ये दि.०६-०४-२००९ रोजी व नागपूर खंडपीठ यांनी सुमोटो याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये दि.३-१२-२००८ रोजी राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती पावले उचलावीत व विद्यापीठाचा आकृतिबंध त्वरीत निश्चित करावा असे आदेशित केले. विद्यापीठातील अपुऱ्या मनुष्यबळामुळे शिक्षणावर होणारा संभाव्य दुष्परिणाम व मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेता, **संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक ६-७-२००९ च्या**

**शासन निर्णयान्वये श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठांच्या शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.**

२. सदर दि.६-७-२००९ च्या शासन निर्णयान्वये विद्यापीठांसाठी गटनिहाय पदे मंजूर करण्यात आली असून त्यामध्ये श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी एकूण ३७३ पदे मंजूर करण्यात आली आहेत. सदर ३७३ पदांची वर्गवारी गट-अ-२३, गट-ब-१४, गट-क-२३२ आणि गट-ड-१०४ अशी आहे.

२.२ संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयामधील परिच्छेद ७ मध्ये विद्यापीठांनी पदनिहाय सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे सूचित करण्यात आले. त्यानुसार श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठाचे संदर्भ क्र १ येथील दिनांक २१-०६-२०१० च्या पत्रामध्ये सविस्तर पदनिहाय प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्यानुसार सदर विद्यापीठाच्या शिक्षकेतर पदांच्या पदनिहाय आकृतीबंधासंदर्भात खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन निर्णय

३. श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी संदर्भाधीन क्र.३ येथील दि.६-७-२००९ च्या शासन निर्णयान्वये एकूण ३७३ शिक्षकेतर पदांच्या ज्या आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात आलेली आहे **त्याचा पदनिहाय तपशील आता सोबतच्या प्रपत्रक अ आणि ब यामध्ये दर्शविल्याप्रमाणे मान्य करण्यात येत आहे.**

४. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रातील रिक्त पदे संदर्भाधीन क्र.३ येथील दि.६-७-२००९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून भरण्यात यावीत.

५. तसेच सोबतच्या प्रपत्र "ब" मधील स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या पदावरील व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यानंतर किंवा कोणत्याही कारणास्तव रिक्त झाल्यानंतर ते पद निरसीत करण्यात यावे.

६. तसेच सोबतच्या प्रपत्र "क" मधील स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या पदावरील (स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ७१) कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ते पद निरसीत करुन त्याऐवजी स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविलेल्या पदनामाप्रमाणे ७१ पदांच्या संख्येत कोणताही बदल न करता सदर पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २७०/०९ विसु-१ दि. २/५/२००९ अन्वये आणि उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

८.     हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१००९०६१४४११५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी/-
(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा. कुलगुरु, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई
५) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई
६) विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई
७) कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,
८) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
९) अधिदान व लेखा अधिकारी
१०) वित्त विभाग
११) निवड नस्ती,

(शासन निर्णय क्रमांक टीएमयु २०१०/(४५५/१०)-विशि-१, दिनांक ६ सप्टेंबर, २०१० चे सहपत्र)

## प्रपत्र-अ

## श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठासाठी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात आलेल्या शिक्षकेतर पदांचा पदनिहाय तपशील.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| | गट- अ | | |
| ०१ | उपकुलसचिव | रु. १०६५०-१५८५० | ६ |
| ०२ | विद्यार्थ्यांचा अधिष्ठाता | रु. १०६५०-१५८५० | १ |
| ०३ | विद्यापीठ अभियंता | रु. १०६५०-१५८५० | १ |
| ०४ | उपवित्त व लेखा अधिकारी | रु. १०६५०-१५८५० | १ |
| ०५ | सहाय्यक कुलसचिव | रु. ८०००-१३५०० | ६ |
| ०६ | विद्यार्थ्यांचा सहाय्यक अधिष्ठाता | रु. ८०००-१३५०० | १ |
| ०७ | इन्स्टूमेंटल ऑफिसर (लायब्ररी) | रु. ८०००-१३५०० | १ |
| ०८ | मेनटेनस इंजिनियर | रु. ८०००-१३५०० | १ |
| ०९ | कुलगूरुचे कार्यकारी सहाय्यक | रु. ८०००-१३५०० | १ |
| १० | सहाय्यक वित्त व लेखा अधिकारी | रु. ८०००-१३५०० | १ |
| ११ | लेखापाल | रु. ७४५०-११५०० | १ |
| १२ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक | रु. ७४५०-११५०० | २ |
| | | एकूण | २३ |
| | गट-ब | | |
| १३ | कार्यालयीन अधिक्षक | रु. ६५००-१०५०० | ६ |
| १४ | सहाय्यक लेखापाल | रु. ६५००-१०५०० | ४ |
| १५ | बरसार | रु. ६५००-१०५०० | १ |
| १६ | साईट इंजिनियर | रु. ६५००-१०५०० | १ |
| १७ | कॅमेरामेन | रु. ६५००-१०५०० | १ |
| १८ | सिस्टर टयुटर | रु. ६५००-१०५०० | १ |
| | | एकूण | १४ |
| | गट- क | | |
| १९ | वरिष्ठ लघुलेखक | रु. ६५००-१०५०० | ०२ |
| २० | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक | रु. ५५००-९००० | ०७ |
| २१ | कनिष्ठ लेखापाल | रु. ५५००-९००० | ०७ |
| २२ | रोखापाल | रु. ५५००-९००० | ०१ |
| २३ | सहाय्यक लेखापाल | रु. ५५००-९००० | ०१ |
| २४ | कार्यालयीन सहाय्यक | रु. ५५००-९००० | ०२ |
| २५ | मुख्य लिपीक | रु. ५५००-९००० | ०३ |
| २६ | कनिष्ठ कार्यालयीन अधिक्षक | रु. ५५००-९००० | ०१ |
| २७ | सांखिकी सहाय्यक | रु. ५५००-९००० | ०१ |
| २८ | कक्ष परिचारीका | रु. ५५००-९००० | ०२ |
| २९ | संशोधन सहाय्यक (कनिष्ठ) | रु. ५५००-९००० | ०२ |
| ३० | संशोधन सहाय्यक (कनिष्ठ) | रु. ५५००-९००० | ०३ |
| ३१ | कनिष्ठ लघुलेखक | रु. ५५००-९००० | ०४ |
| ३२ | कनिष्ठ लघुलेखक | रु. ५५००-९००० | ०६ |
| ३३ | अधिपरिचारीका | रु. ५५००-९००० | ०८ |
| ३४ | सुरक्षा अधिकारी | रु. ५५००-९००० | ०१ |
| ३५ | कुलगुरुंचे खाजगी सहाय्यक | रु. ५५००-९००० | ०१ |
| ३६ | साउंड रेकॉर्डीस्ट | रु. ५५००-९००० | ०१ |
| ३७ | वरिष्ठ तांत्रिकी | रु. ५५००-९००० | ०१ |
| ३८ | बगीचा पर्यवेक्षक | रु. ५५००-९००० | ०१ |
| ३० | मुख्य लिपीक (महाविद्यालय) | रु. ५०००-८००० | ०२ |
| ४० | ईमारत पर्यवेक्षक | रु. ४५००-७००० | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | कनिष्ठ ग्रंथालय सहाय्यक | रु. ४५००-७००० | १८ |
| ४२ | तंत्र सहाय्यक | रु. ४५००-७००० | ०९ |
| ४३ | कनिष्ठ तांत्रिकी | रु. ४५००-७००० | ०१ |
| ४४ | भंडारपाल | रु. ४५००-७००० | ०१ |
| ४५ | विजतंत्री | रु. ४०००-६००० | ०१ |
| ४६ | वरिष्ठ लिपीक | रु. ४०००-६००० | २३ |
| ४७ | सहाय्यक रोखापाल | रु. ४०००-६००० | ०१ |
| ४८ | लघु टंकलेखक | रु. ४०००-६००० | ०१ |
| ४९ | वरिष्ठ टंकलेखक | रु. ४०००-६००० | ०६ |
| ५० | प्रयोगशाळा सहाय्यक | रु. ४०००-६००० | ९ |
| ५१ | अर्धवेळ लेखापाल | रु. ४०००-६००० | १ |
| ५२ | दुरध्वनी चालक | रु. ३२००-४९०० | ४ |
| ५३ | तबलावादक | रु. ३२००-४९०० | ५ |
| ५४ | नर्सिंग स्कूल टिचर | रु. ३२००-४९०० | २ |
| ५५ | कनिष्ठ टंकलेखक | रु. ३२००-४९०० | १४ |
| ५६ | कनिष्ठ तांत्रिकी सहाय्यक | रु. ३०५०-४५९० | १ |
| ५७ | सुरक्षा पर्यवेक्षक | रु. ३०५०-४५९० | १ |
| ५८ | कनिष्ठ लिपीक | रु. ३०५०-४५९० | ३२ |
| ५९ | लिपीक- टंकलेखक | रु. ३०५०-४५९० | ३९ |
| ६० | ग्रंथालय लिपीक | रु. ३०५०-४५९० | २ |
| ६१ | नळ कारागीर | रु. ३०५०-४५९० | २ |
| | | **एकूण** | **२३२** |

**गट- ड**

| | | | |
|---|---|---|---|
| ६२ | वाहनचालक | रु. ३०५०-४५९० | **७** |
| ६३ | दफ्तरी | रु. ३०५०-४५९० | **१** |
| ६४ | हवालदार | रु. २७५०-४००० | **३** |
| ६५ | प्रयोगशाळा परिचर | रु. २६१०-४००० | **४** |
| ६६ | ग्रंथालय परिचर | रु. २६१०-४००० | **४** |
| ६७ | उद्‌वाहक | रु. २६१०-४००० | **३** |
| ६८ | शिपाई | रु. २५५०-३२०० | **६०** |
| ६९ | डोमेस्टिक सर्वंट | रु. २५५०-३२०० | **७** |
| ७० | शिपाई-हमाल | रु. २५५०-३२०० | **६** |
| ७१ | शिपाई-प्रयोगशाळा परिचर | रु. २५५०-३२०० | **२** |
| ७२ | शिपाई-ग्रंथालय परिचर | रु. २५५०-३२०० | **५** |
| ७३ | मेड सर्वंट | रु. २५५०-३२०० | **२** |
| | | **एकूण** | **१०४** |
| | | **एकूण (अ + ब + क + ड)** | **३७३** |

(शासन निर्णय क्रमांक टीएमयु २०१०/(४५५/१०)-विशि-१, दिनांक ६ सप्टेंबर, २०१० चे सहपत्र)

# प्रपत्रक - ब

## भूतसंवर्गातील (Super numary) मंजूर पदांची यादी

### प्रपत्र - क

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी. |
|---|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक | १३ | २५५०-३२०० |
| २. | माळी | १३ | २५५०-३२०० |
| ३. | स्वच्छक | ११ | २५५०-३२०० |
| | एकूण..... | ३७ | |

## प्रपत्र - क

**श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठासाठी मंजूर आकृती बंधानुसार सेवानिवृत्तीनंतर वा अन्य कोणत्याही कारणाने रिक्त झाल्यास ती पदे निरसीत करून त्या ऐवजी वेगळया पदनामाने भरावयाच्या पदांचा तपशील.**

| अ. क्र. | पदनाम | सेवानिवृतीनंतर चे पद | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | इनस्टूमेंटल ऑफिसर | सहाय्यक कुलसचिव | १ | रु.८०००-१३५००. |
| २ | बरसार | कार्यालयीन अधिक्षक | १ | रु.६५००-१०५००. |
| ३ | कार्यालयीन सहाय्यक | मुख्य लिपीक | २ | रु.५५००-९०००. |
| ४ | कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक | मुख्य लिपीक | १ | रु.५५००-९०००. |
| ५ | सहाय्यक लेखापाल | कनिष्ठ लेखापाल | १ | रु.५५००-९०००. |
| ६ | संशोधन सहाय्यक (कनिष्ठ) | मुख्य लिपीक | ३ | रु.५५००-९०००. |
| ७ | कनिष्ठ लघुलेखक | कनिष्ठ लेखापाल | ६ | रु.५५००-९०००. |
| ८ | साउंड रेकॉडीस्ट | मुख्य लिपीक | १ | रु.५५००-९०००. |
| ९ | कनिष्ठ तांत्रिकी | मुख्य लिपीक | १ | रु.५५००-९००० |
| १० | वरिष्ठ टंकलेखक | वरिष्ठ लिपीक | ६ | रु.४०००-६०००. |
| ११ | अर्धवेळ लेखापाल | वरिष्ठ लिपीक | १ | रु.४०००-६०००. |
| १२ | कनिष्ठ टंकलेखक | लिपीक टंकलेखक | १४ | रु.३०५०-४५९० |
| १३ | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक | लिपीक टंकलेखक | १ | रु.३०५०-४५९० |
| १४ | कनिष्ठ लिपीक | लिपीक टंकलेखक | ३२ | रु.३०५०-४५९० |
| | | एकूण | ७१ | |